**राष्ट्रीय सहकारी विकास निगमाच्या,सहकारी सूत गिरण्यांना अर्थसहाय्य करण्याच्या विविध योजना राज्यात लागू करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सहकार व वस्त्रोद्योग विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांक : सूतगि-११२०००/प्र.क्र.१२१/टेक्स-१(अ)
मंत्रालय विस्तार,मुंबई-४०० ०३२
दिनांक : १६ मार्च,२००२

**वाचा** : शासन निर्णय क्रमांक : सूतगि-११२०००/प्र.क्र.१२१/टेक्स-१,
दिनांक १७ नोव्हेंबर,२०००

**शासन शुध्दीपत्रक :-**

शासन निर्णय क्रमांक :सूतगि-११२०००/प्र.क्र.१२१/टेक्स-१,दिनांक १७ नोव्हेंबर,२००० परिच्छेद क्रमांक ११ मध्ये **"पहिल्या टप्प्यात १२५०० चात्यांची गिरणी प्रस्तापित करण्यासाठी अर्थसहाय्याचा विचार करण्यात येणार असल्याने प्रकल्प अहवालात पहिला टप्पा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारे अर्थसहाय्य व दुसरा टप्पा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारे अर्थसहाय्य अलगरित्या दर्शविण्यात यावे"** या ऐवजी **"ओपन एन्ड प्रकारच्या गिरण्यांना २५००० चात्यांची जोड एकाच टप्प्यात करण्यात यावी"** असे वाचण्यात यावे.

२. या शासन निर्णयातील परिशिष्ट "ब" मधील -

अ) **कापूस उत्पादकांच्या गिरण्यांसाठी** -

१) नवीन गिरण्यांसाठी -

| | | |
|---|---|---|
| सभासद सहभाग | : | १० टक्के |
| राष्ट्रीय सहकारी विकास निगम | : | प्रत्यक्ष खर्चाच्या २० टक्के किंवा राज्य शासनामार्फत संस्थेस द्यावयाच्या शासकीय भागभांडवलाच्या ५० टक्के यापैकी जी कमी असेल ती रक्कम |
| राज्य शासनामार्फत | : | ४० टक्के भागभांडवल |

ब) **हातमाग विणकरांच्या गिरण्यांसाठी** -

१) नवीन गिरण्यांसाठी -

| | | |
|---|---|---|
| राष्ट्रीय सहकारी विकास निगमामार्फत राज्य शासनास कर्ज | : | एकूण प्रकल्प खर्चाच्या २२.५ टक्के किंवा शासकीय भागभांडवलाच्या ५० टक्के यापैकी जी कमी असेल ती रक्कम |

| | | |
|---|---|---|
| राज्य शासनामार्फत संस्थेस कर्ज: | | एकूण भागभांडवलाच्या ५० टक्के पर्यंत वजा सभासदांचा सहभाग तो किमान ५ टक्के असावा |
| सभासदाचा सहभाग | : | ५ टक्के |

क) **यंत्रमाग विणकरांच्यां सहकारी सुत गिरण्यासाठी -**

१) नवीन गिरण्यांसाठी -

[redacted]

| | | |
|---|---|---|
| राज्य शासनामार्फत संस्थेस कर्ज : | | एकूण भागभांडवलाच्या ४० टक्के |

**ऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे**

| | | |
|---|---|---|
| सभासदांचा सहभाग | : | प्रकल्प किंमतीच्या ५ टक्के |
| राष्ट्रीय सहकारी विकास निगम | : | ज्या सूत गिरण्यांनी त्यांच्या प्रकल्पावर ५० टक्के पेक्षा जास्त रक्कम खर्च केलेली आहे अशाच सूत गिरण्यांना त्यांच्या प्रकल्प किंमतीच्या २२.५ टक्के म्हणजेच शासकीय भाग भांडवलाच्या ५० टक्के |
| राज्य शासनामार्फत | : | ४५ टक्के भागभांडवल (रा.स.वि.नि.ने मंजूर केलेल्या रक्कमेसहीत) |

३) **तसेच परिशिष्ट "ब" मधील -**

क) यंत्रमाग विणकरांच्या सहकारी सूत गिरण्यांसाठी -

२) आधुनिकीकरणासाठी -

| | | |
|---|---|---|
| राष्ट्रीय सहकारी विकास निगमाकडून राज्य शासनास कर्ज | : | ८७.५ टक्के |
| राज्य शासनाकडून संस्थेस कर्ज | : | ८० टक्के |
| राज्य शासनाकडून संस्थेस भागभांडवल | : | १५ टक्के (यापैकी ७.५ टक्के रक्कम राज्य शासनाने स्वतःच्या साधनसामुग्रीतून उपलब्ध करुन देणे आवश्यक) |
| सभासदांचा सहभाग | : | ५ टक्के |

**ऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे**

| | | |
|---|---|---|
| राष्ट्रीय सहकारी विकास निगमाकडून राज्य शासनास कर्ज | : | ९० टक्के |

| | | |
|---|---|---|
| राज्य शासनाकडून संस्थेस कर्ज | : | ६० टक्के |
| राज्य शासनाकडून संस्थेस भागभांडवल | : | ३० टक्के |
| सभासदांचा सहभाग | : | १० टक्के |

3. सदर शुध्दीपत्रक नियोजन विभागाच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमाक प्र.क्र.३६३/व्यय-२ दिनांक : १४/३/२००२ अन्वये मिळालेल्या [redacted]

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(नि.भा.गोसावी)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग

प्रति,

१) राज्यपालांचे सचिव
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
४) मा.राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
५) प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) सहकार व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई
६) सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे
७) संचालक,हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग,महाराष्ट्र राज्य,नागपूर
८) कार्यकारी संचालक,राष्ट्रीय सहकारी विकास निगम,४,सिरी इंन्स्टिट्यूशनल एरिया, हौजखास, नवी दिल्ली ११० ०१६
९) रिजनल डायरेक्टर,राष्ट्रीय सहकारी विकास निगम,क्षेत्रिय कार्यालय(पश्चिम), ५, बी.जे.रोड,पुणे-४११ ००१
१०) अध्यक्ष,सर्व सहकारी सूत गिरण्या
११) सर्व प्रादेशिक उप संचालक,हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग, सोलापूर, नागपूर, औरंगाबाद, मुंबई
१२) सर्व जिल्हा उप निबंधक,सहकारी संस्था
१३) वित्त विभाग (कार्यासन व्यय-२/अर्थोपाय शाखा/अर्थसंकल्प-१२)
१४) नियोजन विभाग (का-१४)
१५) कार्यासन अधिकारी (रोख शाखा) सहकार व वस्त्रोद्योग विभाग
१६) कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य सहकारी सूत गिरण्यांचा महासंघ मर्यादित, वकील हाऊस,पुरुरा माळा,१८,स्प्रॉट रोड,बेलॉर्ड इस्टेट,मुंबई-१
१७) महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र राज्य-१ मुंबई/महाराष्ट्र राज्य-२ नागपूर (प्रत्येकी ३ प्रती)

१८) महालेखापाल (लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य-१ मुंबई/महाराष्ट्र राज्य-२ नागपूर
(प्रत्येकी ३ प्रती)
१९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई
२०) अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
२१) ~~सर व्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित,मुंबई-२३~~
२२) कार्यासन-१७-सी, १६-सी,सहकार व वस्त्रोद्योग विभाग
२३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२४) निवड नस्ती.